# मंत्रिमंडळ निर्णय
## दिनांक : २५ नोव्हेंबर २०२१
## ( बैठक क्र. ८९ )

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | विधानमंडळाचे हिवाळी अधिवेशन मुंबई येथे घेण्याबाबत मंत्रिमंडळ बैठकीत चर्चा | संसदीय कार्य |

**विधानमंडळाचे हिवाळी अधिवेशन मुंबई येथे**
**घेण्याबाबत मंत्रिमंडळ बैठकीत चर्चा**

महाराष्ट्र विधानमंडळाचे हिवाळी अधिवेशन २२ ते २८ डिसेंबर २०२१ रोजी मुंबई येथे अभिनिमंत्रित करण्याबाबत आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची ऑनलाईन उपस्थिती होती. यासंदर्भात विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत चर्चा होऊन अंतिम निर्णय घेण्यात येईल असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.

यावेळी मंत्रिमंडळ बैठकीत कोविड परिस्थिती, लसीकरण, पीक पाणी परिस्थिती आदी विषयांवर चर्चा झाली. परिवहन मंत्री अनिल परब यांनी एसटी संपासंदर्भात राज्य शासनाने घेतलेल्या निर्णयांची माहिती मंत्रिमंडळास दिली.

युरोपमध्ये कोविड परिस्थिती बिकट होत असून आपण देखील महाराष्ट्रात पुरेशी आवश्यक ती काळजी घेण्याची गरज आहे. कमी लसीकरण झालेल्या जिल्ह्यांत लवकरात लवकर लसीकरण पूर्ण करावे तसेच चाचण्या वाढवाव्यात. कोविडचा धोका पूर्णपणे गेलेला नाही त्यामुळे आरोग्याचे नियम पाळण्यासाठी सर्वांनी कसोशीने प्रयत्न केले पाहिजेत यावरही चर्चा झाली.

-----०-----